(कार्यालयीन कामासाठी ) (नगरसचिव कार्यालय )

# मालेगाव शहर महानगरपालिका, मालेगाव

## विशेष महासभा ऑगस्ट -२०२६

---

**विशेष सभा क्र.०५** **सुचना** **कार्यपत्रिका क्र.०५**

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ मधील नियम क्र.१ (क) व (ड) अन्वये, मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार मालेगाव शहर महानगरपालिकेची विशेष महासभा क्र. ०५ दिनांक २४ /०८/२०२६, सोमवार रोजी दु. ४:०० वा महानगरपालिकेच्या साथी निहाल अहमद सभागृह येथे आयोजन करण्याचे निश्चित केले आहे. करीता सर्व सन्माननीय पालिका सदस्य व सर्व संबंधितांना विनंती की, प्रायोजित सभेस निर्धारित वेळी उपनिर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहुन सहकार्य करावे.

---

<u>सदर विशेष सभेस खालील विषयांचा विचार होईल.</u>

---

**विषय क्र.०६ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.मोहम्मद मुस्तकीम मोहम्मद मुस्तफा यांचे यादी अन्वये, मालेगाव महानगरपालिका क्षेत्रात दुरूसंचार कंपन्यांनी टाकलेल्या OFC नेटवर्कसाठी लागू असलेले शुल्क वसूल करणेकामी विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**विषय क्र.०७ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.अन्सारी मोहम्मद असलम खलील अहमद यांचे यादी अन्वये, प्रशासकीय कार्यकाळात पारीत करण्यात आलेल्या भुसंपादन व आरक्षणात बदल संदर्भातील ठरावाबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र.०८ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.उध्दव उमाकांत दरेकर यांचे यादी अन्वये, मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातून अंदाजे २ हजार कोटीची रक्कम केंद्र व राज्य शासनाव्दारे वसूल केली जाते. परंतू त्याबदल्यात शासनाकडून महानगरपालिकेला स्थानिक संस्था कर, जी.एस.टी. अनुदान याव्दारे वार्षिक रक्कम २६६.७६ कोटी प्राप्त होत असून सदरची रक्कम महानगरपालिकेचे कामकाज चालविण्याच्या दृष्टीकोनातून अत्यंत कमी असल्याने, मालेगाव शहरातून वसूल होणाऱ्या एकूण जी.एस.टी.रक्कमेपैकी २५ टक्के रक्कम महानगरापालिकेस (५०० कोटी) विकास कामांसाठी मिळविणेकामी करणेकामी विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**विषय क्र.०९ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.शेख खालीद अब्दुल रशीद यांचे यादी अन्वये, मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मस्जिद, मंदिर, चर्च, गरूव्दारा, बौध्द विहार इ. धार्मिक स्थळांच्या ठिकाणी सि.सि.टि.व्ही. कॅमेरे बसविणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

पान नं. २ वर..

Scanned with OKEN Scanner

**विषय क्र.१०** :- मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.अन्सारी मोहम्मद असलम खलील अहमद यांचे यादी अन्वये, मालेगाव महानगरपालिका पाणी पुरवठा, सुरक्षा व्यवस्था आणि कर्मचारी उपस्थितीवर देखरेख ठेवणेकामी अत्याधुनिक उपाय म्हणून इ.एस.आर कनेक्टीव्हिटी ऑटोमेशन प्रकल्प उभारणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**(साजिद अहमद हसन अब्बास)**
**नगरसचिव**
**मालेगाव शहर महानगरपालिका, मालेगाव.**

प्रति, -----------------------------------------------------------------

मा. सदस्य, मालेगाव महानगरपालिका मालेगाव

**टिप:-** कार्यालयीन वेळेत विषया संदर्भातील कागदपत्र नगरसचिव विभागात पहावयास मिळतील.

नगरसचिव/ जा.क्र. / २५२/२०२६
दिनांक १८ /०८/२०२६